# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांक:15.05.2026 वारः शुक्रवार

---

1. राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार
2. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतील पाच लाख घरांचं आज साताऱ्यात लोकार्पण
3. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून पालखी मार्गांची पाहणी; विविध विकासकामांचीही घोषणा आणि
4. पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर इंधन बचतीसाठी राज्य शासनाच्या विविध उपाययोजना

**<u>मतदार यादी-SIR</u>**

राज्यात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया 30 जूनपासून सुरू होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं काल 16 राज्य आणि 3 केंद्र शासित प्रदेशातल्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार राज्यात 30 जून ते 29 जुलै दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी  घरोघरी भेटी देऊन मतदारांची पडताळणी करतील. त्यानंतर 5 ऑगस्ट रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. 5 ऑगस्ट ते 4 सप्टेंबर दरम्यान हरकती दाखल करता येतील. या हरकतींवर 3 ऑक्टोबरपर्यंत सुनावणी होऊन निकाल दिले जातील आणि 7 ऑक्टोबरला राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. 1 ऑक्टोबरपर्यंत वयाची 18 वर्ष पूर्ण करणाऱ्या नागरिकांची नावं या मतदार यादीत समाविष्ट होतील. राज्यात सध्या 9 कोटी 86 लाख 44 हजार 413 मतदारांची नोंद आहे.

**<u>केरळ</u>**

केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन यांचं नाव निश्चित झालं आहे. काँग्रेसतर्फे काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सतीशन यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

राज्यातल्या सहा मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्याचा निर्णय काल मंत्रीमंडळानं घेतला. हा गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात टाकण्यासाठी मोफत उपलब्ध करून दिला जाईल. या धोरणामुळे प्रकल्पांतील पाणीसाठा वाढणार असून धरणांचं जतन आणि संवर्धन होण्यास मदत होईल.

स्पर्धा परीक्षांमध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेला बसण्याची संधी या आधारे सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतच्या धोरणालाही काल मान्यता देण्यात आली.

पुणे महानगरपालिकेच्या नदी पुनरुज्जीवन प्रकल्पातील मुळा-मुठा नदीच्या विकासासाठी तीन शासकीय जमिनी महापालिकेला विनामुल्य हस्तांतरित करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला.

**<u>सातारा आवास योजना</u>**

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थींचं संमेलन आणि महा आवास अभियानाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आज सातारा इथं होणार आहे. केंद्रीय ग्रामीण विकास आणि कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान,  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

'प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजने'अंतर्गत उभारण्यात आलेली पाच लाख घरं लाभार्थींना वितरित केली जाणार असून सहा लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या जातील. या योजनेअंतर्गत आतापर्यंत तीन कोटी घरं उभारण्यात आली आहेत.

**पालखी मार्ग**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गांच्या कामाची पाहणी केली तसंच विविध विकासकामाचा आढावा घेतला. पालखी मार्गांचं बरंचसं काम झालं असून लाखो वारकऱ्यांची 'वारी' सुखकर आणि आल्हाददायक व्हावी, या उद्देशानं विकासकामं करण्यात येत असल्याचं गडकरी यांनी फलटण इथं पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी त्यांनी विविध विकास कामांची घोषणाही केली. या दौऱ्यात गडकरी यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करत संपूर्ण प्रवास बसने केला.

**इंधन बचत**

पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाच्या अनुषंगानं राज्य शासनानं महत्त्वपूर्ण उपाययोजना जाहीर केल्या आहेत. परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूकीचा वापर वाढविणे, ऊर्जा बचत, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, या बरोबरच घरात आणि उपाहारगृहांमध्ये पीएनजीला प्रोत्साहन, खाद्यतेलाच्या वापरात कपात करण्यासाठी शासकीय कॅन्टीन, अंगणवाडी, रुग्णालये आणि वसतिगृहांमध्ये खाद्य पदार्थांमध्ये बदल करण्यात येणार असून, पाम आणि सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा आणि मोहरी तेलाच्या वापराला चालना दिली जाणार आहे.

पोलीस विभागाकडून वाहनांच्या मिरवणुका, दुचाकी रॅलींना परवानगी नाकारण्यात येणार असून, शासकीय जाहिराती आणि खर्चिक उपक्रमांवरही मर्यादा आणण्यात येणार आहेत. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी याबाबत परिपत्रक जारी केलं आहे.

दरम्यान, पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल दुचाकीनं प्रवास करत विधानभवनात दाखल झाले. तर एकनाथ शिंदे यांनी पर्यावरणपूरक प्रवासाचा संदेश देत इलेक्ट्रिक कारनं विधानभवन गाठलं. इंधन बचतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवणं हा यामागचा उद्देश असून या विषयावर विरोधकांनी राजकारण न करता प्रगल्भता दाखवावी, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**एएम इंटेलिजन्स लॅब**

राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' यांच्यात काल 1 लाख 14 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार झाला. या प्रकल्पामुळे राज्यात 8 हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त काल सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात आलं. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केलं.

पुण्यातल्या डेक्कन जिमखाना परिसरातल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या नूतनीकरणाचं भूमिपूजन काल केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झालं.

रत्नागिरी आणि धुळ्यासह विविध ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली; रक्तदान शिबिरांचंही आयोजन करण्यात आलं होतं.

नाशिकमध्ये रामशेज किल्ल्याच्या परिसरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त एक लाख बीज गोळ्यांची उधळण करण्यात आली.

**विधान परिषद**

राज्याच्या विधान परिषदेतल्या दहा नवनिर्वाचित सदस्यांचा काल शपथविधी झाला. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यात भाजपाचे डॉक्टर प्रमोद जठार, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक

कोल्हे, संजय भेंडे आणि डॉक्टर प्रज्ञा सातव यांचा, शिवसेनेच्या डॉक्टर नीलम गोऱ्हे, बच्चू कडू आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे यांचा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे झिशान सिद्दीकी यांचा समावेश आहे.

**उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक**

राज्यात येत्या एक जुलैपासून वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसवणं अनिवार्य करण्यात आलं आहे. वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसवण्यासाठी वाहनधारकांना येत्या 30 जूनपर्यंतची मुदत देण्यात आल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. या नियमाचं उल्लंघन करणाऱ्यांना एक हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे.

**सुनेत्रा पवार**

प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्याचा निर्धार करून आरोग्यदायी, सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र घडवू, असं आवाहन उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल केलं. पुणे जिल्हा परिषदेच्यावतीने बारामती तालुक्यातील होळ येथे उभारण्यात आलेल्या मॉडेल प्राथमिक केंद्राचे लोकार्पण काल करण्यात आलं, तसंच जिल्ह्यातील 45 मॉडेल प्राथमिक केंद्राच्या दूरदृश्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**बॉम्ब**

पुण्यातील हडपसर परिसरात एका खासगी रुग्णालयाजवळ बुधवारी आढळलेली बॉम्बसदृश वस्तू बॉम्ब शोधक आणि नाशक पथकानं निकामी केली. या प्रकरणी पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतलं असून त्याची चौकशी सुरु आहे.

**नीट**

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयनं लातूरमधून एका निवृत्त प्राध्यापकाला अटक केली आहे. याप्रकरणी पुण्यातून एका महिलेला आणि एका विद्यार्थ्याला अटक झाली आहे.

**स्वगणना**

चिपळूण तालुक्यातलं मौजे दळवटणे हे स्वगणना प्रक्रिया 100 टक्के पूर्ण करणारं रत्नागिरी जिल्ह्यातलं पहिलं गाव ठरलं आहे. या गावानं आपल्या सर्व नऊ वाड्यांमधील 425 कुटुंबांची नोंदणी यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

**उत्तर प्रदेश-मृत्यू**

उत्तर प्रदेशात गेल्या दोन दिवसात झालेल्या वादळी पाऊस आणि वीज पडल्याच्या घटनांमुळे 104 जणांचा मृत्यू झाला आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बाधित लोकांना शक्य ती सर्व मदत पुरवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**हवामान**

राज्यात सर्वच विभागात उद्या तुरळक ठिकाणी वीजांसह पावसाची शक्यता आहे. कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा अंदाजही हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.